## प्रकरण पहिले

## ग्रामीण आणि प्रादेशिक साहित्य स्वरूप विचार

# प्रकरण पहिले

## ग्रामीण आणि प्रादेशिक साहित्य स्वरूप विचार

**प्रास्ताविक:**

१९४५ नंतर मराठी कथात्मक लेखन करणाऱ्या लेखकामध्ये श्री. हमीद दलवाई हे एक प्रमुख लेखक आहेत. हमीद दलवाई यानी मुस्लिम समाजामध्ये मुलगामी स्वरूपाच्या सुधारणा करण्यासाठी झटणारे समाजसुधारक म्हणून महाराष्ट्राच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनामध्ये गौरवपूर्ण स्थान प्राप्त केले आहे. प्रस्तुत लघुप्रबंधात मात्र हमीद दलवाई यांच्या कथात्मक साहित्याचा अभ्यास करणे अभिप्रेत आहे. त्यांच्या कथात्मक साहित्यातून ग्रामीण जीवनाचे चित्रण आलेले आहे. हमीद दलवाई आपल्या कथात्मक साहित्याकडे सामाजिक अंगाने बघतात व त्या दृष्टीने ग्रामीण जीवनाचे चित्रण करतात. त्यांच्या कथात्मक साहित्यात समाजजीवनाचे कोणकोणते विशेष पहावयास मिळतात. समाजजीवनाचे चित्रण करणाऱ्या या साहित्याला वाङ्मयीन गुणवत्ता कोणत्या प्रकारे प्राप्त होते. या सर्व बाबींचा विचार करणे हा लघुप्रबंधाचा उद्देश आहे.

हमीद दलवाई यांच्या कथेतून कोकणातील ग्रामीण जीवनाचे चित्रण आलेले आहे. तर इंधन ही कादंबरी कोकणातील विशिष्ट अशा प्रदेशाचे चित्रण करणारी प्रादेशिक कादंबरी आहे. त्यामुळे त्यांचे कथात्मक साहित्य समजावून घेण्यासाठी आपणाला अगोदर ग्रामीण व प्रादेशिक साहित्याचे स्वरूप समजावून घेणे आवश्यक आहे.

## ग्रामीण नागर भेद:

भारतामध्ये ग्रामीण व नागर असा भेद केला जातो. भारतातील तीन चतुर्थांश समाज खेड्यात राहतो. हा समाज सांस्कृतिकदृष्टया भिन्न अशा पातळ्यावर राहतो. भारत हा शेतीप्रधान देश असून या देशातील ऐंशी टक्के जनता शेतीवर अवलंबून आहे. परंतु ग्रामीण नागर भेद केवळ लोकसंख्येवर करून चालणार नाही. तर या दोन्हीतील संस्कृतीमध्ये फरक असलेला पहावयास मिळतो. "संस्कृती ही सर्वव्यापी गोष्ट आहे. मानव जे जे करतो व ज्या ज्या प्रकारे वागतो, त्या सर्वांवर संस्कृतीचा ठसा उमटलेला असतो. मनुष्याचा विचार व आचार या पध्दतीना वेढून राहणारी प्रतीकात्मक कथन संपर्काद्वारे आपल्याला मिळणारी व त्याच पध्दतीने वर्धमान होत जाणारी संस्कृती ही एक गोष्ट आहे." १ त्या दृष्टीने ग्रामीण व नागर यामध्ये असलेला सांस्कृतिक फरक लक्षणीय आहे. ग्रामीण संस्कृती स्थिर आहे. परंतु तिच्यामध्ये परिवर्तने होत नाहीत असे नाही. परिवर्तने जरूर होतात पण ती मंदगतीने होतात. ग्रामीण समाज परंपरेने घालून दिलेली बंधने सहसा लवकर मोडीत नाहीत. ग्रामीण समाज मर्यादित आणि एकजिनसी स्वभावाचा असतो. कारण शेतकरी आणि बलुतेदार हे दोन वर्ग तेथे एकमेकावर अवलंबून असणारे असल्याने हा समाज एकजिनसी राहिलेला असतो. आज खेडी व शहरे दळणवळणामुळे एकत्र आली तरी खेड्यातील पारंपरित जीवनपध्दती अजूनही टिकून आहे. याउलट शहरी संस्कृती झपाट्याने बदलत असते. शहरातील समाज हा फार मोठा असून त्यामध्ये कारखानदार, उद्योगपती, व्यापारी, नोकरदार व मजूर असा सर्व प्रकारचा समाज असतो. त्यामुळे तो एकजिनसी समाज असत नाही.

## ग्रामीण हे वर्णनात्मक विशेषण:

मराठी साहित्यात ग्रामीण हे विशेषण लावले जाते. पण साहित्याचे मूल्यमापन करणारे हे विशेषण नाही. कारण ग्रामीण साहित्य असा साहित्याचा वेगळा प्रकार असू शकत नाही. ग्रामीण साहित्य ही सोयीसाठी अभ्यासासाठी वापरावयाची वर्णनपर अशी संज्ञा आहे. ग्रामीणत्वाला स्वत:चे असे मूल्य नाही. ग्रामीण हे विशेषण लेखनामध्ये कशाचे चित्रण आहे याचा फक्त निर्देश करते.

ग्रामीण साहित्य म्हणजे काय हे सांगताना गो.मा. पवार म्हणतात, "ग्रामीण जीवनाचे, मनाचे चित्रण करणारे साहित्य ते ग्रामीण साहित्य म्हणता येते. कथा, कादंबरी व कविता या वाङ्मय-प्रकारांना एकट्याच अर्थाने हे विशेषण लावता येईल."[२]

थोडक्यात ग्रामीण जीवनातून आकाराला येणारे ग्रामीण जीवनातील वास्तवाचे दर्शन घडविणारे साहित्य म्हणजे ग्रामीण साहित्य असे आपणाला म्हणता येईल.

ग्रामीण साहित्य हे अस्सल ग्रामीण व गुणवत्तेच्या दृष्टीने वरच्या दर्जाचे होण्यासाठी ग्रामीण साहित्य लिहिणाऱ्या लेखकाजवळ ग्रामीण संवेदनशीलता असायला हवी. ग्रामीण संवेदनशीलतेसंबंधी गो.मा. पवार यांनी केलेले विवेचन महत्त्वाचे आहे. त्याची आपण सविस्तर चर्चा करू.

ग्रामीण संवेदनशीलता:

ग्रामीण साहित्य हे अस्सल ग्रामीण साहित्य होण्यासाठी ग्रामीण संवेदनशीलतेचा विचार करणे आवश्यक आहे. कोणत्याही लेखकाच्या लेखनाला वैशिष्ट्य प्राप्त होते ते त्याच्या व्यक्तिमत्वामुळे. तो लेखक कोणत्या समाजात जन्माला आला, कोणत्या वातावरणात लहानाचा मोठा झाला, त्याच्यावर कोणते संस्कार झाले, यावर त्याच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण अवलंबून असते. लेखकाचे व्यक्तिमत्व कसे आहे, यावर त्याची अनुभव घेण्याची क्षमता व धाटणी ठरत असते. अनुभव घेण्याच्या त्याच्या या क्षमतेला किंवा धाटणीला आपण लेखकाची संवेदनशीलता म्हणतो. जो लेखक ग्रामीण जीवनात वाढलेला असेल, ग्रामीण जीवनात घडला असेल, तेथील समाजाचे संस्कार त्याच्यावर झाले असतील, त्याने ग्रामीण जीवनाचा गाभा आत्मसात केला असेल, त्याची संवेदनशीलता ही

ग्रामीण संवेदनशीलता म्हणता येईल आणि जो लेखक शहरामध्ये वाढलेला असेल, शहरामधील संस्कार त्याच्यावर झालेले असतील, त्याच्या संवेदनशीलतेला शहरी संवेदनशीलता म्हणता येईल.

ग्रामीण संवेदनशीलता ज्या लेखकाजवळ नाही, त्याचे साहित्य हे अस्सल ग्रामीण साहित्य होणार नाही. शहरामध्ये वाढलेल्या व ग्रामीण जीवनाचा परिचय नसलेल्या ना.सी. फडकेंनी आपल्या बावनकशी या कथा-संग्रहात ग्रामीण जीवनावर निम्म्याहून अधिक कथा लिहिलेल्या आहेत. त्यांच्या कथातून ग्रामीण जीवनातील वरवरचा देखील तपशील नीटपणे व्यक्त होत नाही. या लेखकाप्रमाणेच ग.ल. ठोकळ, म.भा. भोसले या लेखकांना ग्रामीण जीवनाचा तपशील माहित असूनही त्यांनी शहरी मनाच्या दृष्टीने रंजकवादी प्रेमकथा लिहिल्या आहेत. अशा लेखकांच्या कथा ग्रामीण कथा होतील, पण त्या अस्सल ग्रामीण कथा होणार नाहीत.

शहरातील जीवनपध्दती व ग्रामीण जीवनपध्दती यामध्ये फरक आहे. खेड्यातील जीवनपध्दती ही पारंपरिक असून एकमेकावर अवलंबून असणारी आहे. पारंपरिक ग्रामीण जीवनामध्ये शेतकरी केंद्रस्थानी असतो. इतर बलुतेदार व इतर वर्ग शेतकऱ्यांना मदत करतो. हे सर्वजण एकमेकावर अवलंबून असतात. यामुळे सर्व समाज सामूहिक स्वभावाचे जीवन जगतो. समाजात एकमेकाबद्दल जिव्हाळ्याची व आपुलकीची भावना निर्माण होते. गावात कोणतीही सुख वा दुःखाची घटना घडली तर त्याचे सर्व गावाला सुख वा दुःख वाटते. एखाद्या घरातील सून माहेराहून आल्यानंतर ते सर्वांना कळावे म्हणून गावभर शिदोरी वाटली जाते. एखाद्या घराचा जावाई तो सर्व गावाचा जावाई होतो. एखाद्याकडून अभिमानास्पद गोष्ट घडली तर त्याचा अभिमान सर्व गावाला वाटतो. लाज्जास्पद करणारी गोष्ट एखाद्याकडून घडली तर त्याची लाज सर्व गावाला वाटते. अशा प्रकारचे सामूहिक जीवन शहरामध्ये नसते.

शहरामधील जीवनपद्धती ग्रामीण जीवनपद्धती यामध्ये फरक असल्यामुळे शहरात वाढलेल्या लेखकाची संवेदनशीलता व ग्रामीण समाजात वाढलेल्या लेखकाची संवेदनशीलता या एकसारख्या असू शकत नाहीत.

ग्रामीण भागातील सर्व समाज आर्थिक, सामाजिक, संबंधाने एकमेकाना बांधलेला असतो. सर्व समाज सामूहिक जीवन जगत असतो. ग्रामीण संवेदनशीलतेविषयी गो.मा. पवार म्हणतात, "समाजातील सगळे जण एकमेकाशी बांधलेले आहेत. आपण या समाजाचा एक घटक आहोत. अशी जाणीव निर्माण होते. अशी जाणीव त्या व्यक्तीच्या ठायी निर्माण झाली म्हणजे तो जीवनाचा अनुभव स्वयंकेंद्रितपणे न घेता समाजशील वृत्ती मानण्याच्या व्यापक भूमिकेवरून घ्यायला लागतो. या प्रकारची अनुभव घेण्याची क्षमता व धाटणी म्हणजे ग्रामीण संवेदनशीलता होय. अशा प्रकारे अनुभव घेणाऱ्याने ग्रामीण जीवनाचा गाभा आत्मसात केला आहे असे म्हणता येईल."[3] ज्या लेखकाजवळ ग्रामीण संवेदनशीलता आहे त्याला ग्रामीण समाजातील व्यक्तीची मने त्यांचे एकमेकाबरोबर असणारे संबंध, धर्म, परंपरा, श्रद्धा, समजुती व संकेत या सर्वांचे यथार्थपणे आकलन होते. ग्रामीण समाजात तो लेखक वाढला असल्याने त्याला ग्रामीण जीवनाचा गाभा आत्मसात करता येतो. त्यामुळे त्याचे साहित्य हे अस्सल ग्रामीण साहित्य होते.

## ग्रामीण समाजाचे स्वरूप:

ग्रामीण साहित्य समजण्यासाठी ग्रामीण साहित्यात येणाऱ्या समाजाचे स्वरूप आणि त्याचे शहरीजीवनापेक्षा असणारे वेगळेपण समजावून घेतले पाहिजे.

१) व्यवसाय:

ग्रामीण भागात राहणा-या या समाजाचा प्रमुख व्यवसाय शेती हा आहे. म्हणून तर भारताला शेतीप्रधान देश म्हटले जाते. ग्रामीण समाजातील शेती व्यवसाय जीवनव्यवस्थेचा पाया आहे. खेड्यात शेतकरी हा केंद्रस्थानी असून इतर समाज त्याच्यावर अवलंबून असतो. खेडेगावात शेतक-यामध्ये प्रामुख्याने तीन वर्ग असतात. पहिला बागाईतदार शेतकरी हा गावात सर्वात श्रीमंत असतो. त्याच्या शेतावर गावातील इतर समाज काम करतो. दुसरा मध्यमवर्गीय शेतकरी असतो. त्याची जमीन थोडी असते. त्यामध्ये तो स्वत: राबतो. तिसरा ज्याच्याजवळ अजिबात जमीन नाही किंवा अगदीथोडी जमीन आहे असा शेतमजुराचा वर्ग असतो. तो दुस-याच्या शेतावर राबून आपली उपजीविका करतो. शेतीबरोबर कोंबड्या पाळणे, गाई-म्हशी पाळून त्यांच्यापासून मिळणारे दूध विकणे हे देखील व्यवसाय केले जातात.

शेतक-याबरोबरच त्यांच्यावर अवलंबून असणारा बारा बलुतेदारांचा वर्ग असतो. चांभार, महार, कुंभार व सुतार हे बलुतेदार शेतक-यांना शेतीसाठी लागणारे व इतर साहित्य पुरवितात. त्याचबरोबर इतरही कामे ती करतात. शेतकरी त्याना आपल्या शेतात पिकणारे धान्य घालतो. अशा त-हेने गावातील सर्व समाज एकमेकावर अवलंबून असतो.

२) कुटुंबव्यवस्था:

ग्रामीण समाजात सामान्यत: संयुक्त कुटुंबपध्दती अस्तित्वात असते. पुरुषप्रधान असणा-या या कुटुंबात स्त्रियांना दुय्यम स्थान असते. घराची सर्व जबाबदारी कारभारी सांभाळीत असतो. त्याच्या सल्ल्यानुसार सर्वजण वागतात. तो सांगेल ती कामे सर्वजण करतात. हा कारभारी सहसा काम करीत नाही. तो सर्वांवर देखरेख करतो. कधीतरी शेतावरून फिरून येतो.

कुटुंबाचा सर्व आर्थिक व्यवहार तो सांभाळतो. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा थोरला मुलगा घरची जबाबदारी सांभाळतो. कुटुंबातील स्त्रिया चूल आणि मूल सोडून इतर कोणत्या गोष्टीत लक्ष घालीत नाहीत. सर्वसामान्य कुटुंबातील स्त्रिया शेतात कामाला जातात. कुटुंबात अंतर्गत भांडणे होतात. पण ती कारभारी मिटवून टाकतो. बायकाबायकात लागणाऱ्या भांडणात पुरुष सहसा लक्ष देत नाही. कुटुंबामध्ये अपंगाच्या व विधवांना संरक्षण मिळते. सर्व कुटुंब त्यांची काळजी घालते. वयोवृध्द पुरुष घरातील जनावरांना घरात आणलेली वैरण टाकण्याचे व वयोवृध्द स्त्रिया मुले सांभाळण्याचे काम करतात.

३) जातीय ताणतणाव:

ग्रामीण समाजात श्रेष्ठ कनिष्ठता पाळली जाते. प्रत्येकजण आप-आपल्या पायरीने वागतो. खालच्या जातीतील मनुष्य कितीही श्रीमंत असला तरी त्याने उद्दामपणे वागू नये अशी सर्वांची धारणा असते. त्याचे उल्लंघन झाले तर गावात जातीय तणाव निर्माण होतो.

गावात स्त्री-पुरुष संबंधातूनही संघर्ष निर्माण होतो. एखाद्या जातीतील स्त्रीने दुसऱ्या जातीतील पुरुषाबरोबर संबंध ठेवले तर ज्या जातीतील स्त्री आहे. त्या जातीची गावात अब्रू जाते आणि त्यातून जातीय तणाव निर्माण होतो.

गावात असा संघर्ष निर्माण झाला की गावातील पाटील, सरपंच व इतर प्रतिष्ठित व्यक्ती तो मिटविण्याचा प्रयत्न करतात आणि चुकलेल्याला योग्य ती शिक्षा देतात.

४) धर्म आणि परंपरा:

ग्रामीण समाजातील व्यक्तीचे मन श्रध्दाळू असते. या समाजात धर्म आणि परंपरा यांना महत्व असते. धार्मिक विधी ग्रामीण समाजातील

जनता मोठ्या श्रद्धेने करते. कर्ज काढून सण करण्याची त्यांची प्रवृत्ती असते. गावात वर्षातून एकदा स्थानिक देवतेची यात्रा असते. ती यात्रा सर्व गाव करते. पांढरीतील देवावर त्यांचा विश्वास असतो. मनातील एखादी इच्छा पूर्ण होण्यासाठी नवस बोलणे. इच्छा पूर्ण झाल्यास नवस फेडणे असे प्रकार चाललेले असतात. आपले आयुष्य सुखाने जावे, आपल्या मुलाबाळांना जनावराना कोणताही आजार होऊ नये. शेतातील पीके चांगली यावीत यासाठी जत्रा केल्या जातात. भुतबाधा, अंगात येणे, देवदेवस्की, दृष्टांत होणे, भानामती, करणी इ. गोष्टी त्यांच्या अंध-श्रद्धेतूनच निर्माण झालेल्या असतात. त्यांच्या या देवभोळेपणामुळे व अंधश्रद्धेमुळे सारे जीवन खुळेपांगळे होते. कुटुंबातील मुलाचे लग्न सर्व धार्मिक विधी करून केले जाते. घर बांधल्यानंतर वास्तुशांती करणे, सत्यनारायणाची पूजा या गोष्टी धर्म आणि परंपरा यांच्या विश्वासातूनच व अंधश्रद्धेतूनच निर्माण झालेल्या असतात. परंपरेने घालून दिलेल्या चाको-या ग्रामीण समाज सहसा मोडीत नाही.

५) <u>करमणुकीची साधने:</u>

आयुष्यभर कष्ट उपसणारी ही माणसे करमणुकीमध्येही रमतात. पण शहरातील करमणुकीची साधने आणि ग्रामीण भागातील करमणुकीची साधने यामध्ये फरक आहे. बलदंड, दणकट खेळताना शहरातील लुटुपुटीचे खेळ पसंत पडत नाहीत. त्यांचे खेळ कुस्त्या, झुंजी, तमाशा, दाणपट्टा, असले असतात. गावातील यात्रेच्या वेळी कुस्त्यांचे मैदान आणि तमाशाचे फड आयोजित केले जातात. कुस्त्यांच्या मैदानात लहानमोठ्या कुस्त्या होतात. तमाशा रात्रभर ग्रामीण जनतेचे मनोरंजन करतो. रेड्यांच्या, बक-यांच्या टकरा घेतल्या जातात. हे खेळ बघण्यासाठी गावातील अबाल-वृद्धापासून सर्वांची गर्दी होते. शेजारी गावचे लोकही आपली उपस्थिती लावतात. यावेळी जीवनातील सारी दु:खे विसरून सर्व समाज त्यामध्ये रमतो.

४) ग्रामीण भाषा:

शहरातील भाषेमध्ये आणि ग्रामीण भागातील भाषेमध्ये फरक आहे. इतकेच नव्हे तर ग्रामीण भागातील भाषेमध्ये देखील प्रदेशानुसार बदल जाणवतो. माडगूळकरांच्या बनगरवाडी या कादंबरीतील भाषा माणदेशाची भाषा आहे. तर श्री.ना. पेंडशांच्या हद्दपार कादंबरीमध्ये उत्तरकोकणी भाषा आहे. या दोन्ही भाषामध्ये फरक आहे. प्रत्येक प्रदेशातील समाजाची बोलण्याची एक विशिष्ट ढब असते. प्रदेशानुसार म्हणी, वाक्प्रचार यामध्ये फरक जाणवतो. ग्रामीण भाषा कठोर, खडबडीत असते. तिच्यामध्ये अर्वाच्य आणि शेलक्या शिव्यांचा वापर केलेला असतो. शहरातील भाषेमध्ये ग्रामीण भाषेसारखा जीवंतपणा व रसरशितपणा नसतो.

ग्रामीण साहित्यात येणाऱ्या ग्रामीण समाजाचा सविस्तरपणे विचार आता आपण केला.

आज मराठी साहित्यात प्रदेशिक संज्ञेचा वापर केला जातो. एकोणिसशे पंचेचाळीस पन्नासच्या सुमारास व्यंकटेश माडगूळकर, गो.नी. दांडेकर, श्री.ना. पेंडसे यांनी कथात्मक साहित्य विशेषत: कादंबऱ्याची निर्मिती केल्यानंतर मराठी साहित्यात प्रादेशिक कादंबरी, कादंबरीतील प्रादेशिकता या संज्ञांचा वापर केला जाऊ लागला.

आज मराठी साहित्यात बनगरवाडी, धग, पाचोळा, गोतावळा, बळी, हद्दपार, इंधन यासारख्या चांगल्या दर्जाच्या प्रादेशिक कादंबऱ्या लिहिल्या गेल्या आहेत.

ग्रामीण आणि प्रादेशिक या वेगवेगळ्या संज्ञांचा वापर केल्यामुळे कोणाते साहित्य प्रादेशिक साहित्य होऊ शकेल व प्रादेशिक साहित्यात सामाजिकता कोणाकोणात्या अंगाने येते याचा विचार पुढे केलेला आहे.

प्रादेशिक साहित्य:

ज्या साहित्यात विशिष्ट अशा प्रदेशाचे चित्रण आलेले असते त्या साहित्याला आपण प्रादेशिक साहित्य म्हणतो. प्रादेशिक साहित्यात त्या प्रदेशातील लोकांचे जीवन, समूह जीवनातील भावभावना त्या लोकांची संस्कृती, समजुती, परंपरा, भाषा त्या प्रदेशातील निसर्ग या सर्वांतून निर्माण झालेले प्रश्न आणि जीवननाट्य यांचे दर्शन घडविले जाते. प्रादेशिक साहित्यातील प्रदेशाचे महत्त्व सांगताना रा.रं.बोराडे म्हणतात, "माणसाची कातडी बाजूला काढून जसा आपण माणसाचा विचार करू शकत नाही तसाच तो प्रदेश बाजूला ठेवून त्या प्रदेशातल्या व्यक्तींचा विचार करू शकत नाही." ४ इतके महत्व त्या साहित्यातील प्रदेशाला असते.

प्रादेशिक साहित्यात सामाजिकता कशा प्रकारे येते व प्रादेशिक साहित्य आणि सामाजिकता यांचा संबंध कशा प्रकारचा आहे याचा सविस्तर विचार करू.

प्रादेशिक साहित्यातील सामाजिकता:

१) लोकमानस आणि सामाजिकता:

प्रादेशिक साहित्याच्या संकल्पनेत लोकमानसाचा समावेश होतो. त्या प्रदेशातील मातीत वाढलेला लोकसमूह, त्यांची संस्कृती, भाषा त्यांचे उपजीविकेचे साधन, सामाजिक रीतिरिवाज आणि त्या प्रदेशातील निसर्ग या सर्वांचे संस्कार लोकमनावर झालेले असतात. आणि त्यातून लोकमन तयार झालेले असते.

दारिद्र्यामुळेच बनगरवाडीतील व्यक्ती आपल्या जगण्यापेक्षा मेंढरांच्या जगण्याला महत्त्व देतात. तशा प्रकारचे लोकमन बागायतदार प्रदेशात पहावयास मिळणार नाही. विशिष्ट प्रदेशातील वातावरणातून लोकमन बनत असल्यामुळे प्रत्येक प्रदेशानुसार लोकमानाच्या घडणीमध्ये वेगळेपणा जाणवतो.

प्रादेशिक साहित्यात लोकमानसाचा आविष्कार झालेला असतो. सामाजिकतेशिवाय लोकमानस नीटपणे व्यक्त होणार नाही आणि लोकमानसाशिवाय प्रादेशिकता नीटपणे व्यक्त होणार नाही.

लेखकाने सामाजिकतेचा आधार न घेता विशिष्ट प्रदेशातील लोकमानसाचा आविष्कार साहित्यात घडविण्याचा प्रयत्न केला तर ती प्रादेशिकता जिवंत व परिणामकारक होणार नाही. ती प्रादेशिकता उपरी वाटेल. म्हणून लेखकाने या लोकमानसाला आविष्कारासाठी त्या समाजाने निर्माण केलेल्या सामाजिक गोष्टीचा आणि सांस्कृतिक जीवनाचा आधार घ्यावा लागतो.

२) <u>सामूहिकता, सांस्कृतिक जीवन आणि सामाजिकता:</u>

प्रादेशिक कादंबरीत समूहजीवन आणि सांस्कृतिक जीवन आलेले असते. एखाद्या व्यक्तीला जरी केंद्रस्थानी ठेवून प्रादेशिक कादंबरी लिहिलेली असली तरी तेथे सामुदायिकता त्या व्यक्तीबरोबर आलेली असते. प्रादेशिक साहित्य हे समूहमनाचा गजर असते. समूहजीवनाच्या आविष्काराशिवाय प्रादेशिक साहित्य होऊ शकत नाही.

पेंडशांच्या कादंबऱ्यामध्ये कोकणात असणाऱ्या सामाजिक चालीरिती, सण, सोहळे, रीतिरिवाज, उत्सव यांचे चित्रण केलेले आहे. त्यामुळे त्यांच्या

कादंबऱ्या जिवंत व परिणामकारक प्रादेशिक कादंबऱ्या ठरलेल्या आहेत. बनगरवाडी, धग, इंधन, पाचोळा, गोतावळा या प्रादेशिक कादंबऱ्या मध्ये तेथील प्रदेशाचे व सांस्कृतिक जीवनाचे वर्णन आल्यामुळे त्या यशस्वी प्रादेशिक कादंबऱ्या ठरलेल्या आहेत.

कादंबरीमध्ये सामूहिक जीवन आणि सांस्कृतिक जीवनाच्या घडामोडी चित्रित करण्यासाठी लेखकाला सामाजिकतेचा आधार घ्यावा लागतो.

3) <u>वातावरण आणि सामाजिकता:</u>

प्रादेशिक कादंबरीमध्ये वातावरण निर्मितीला अनन्यसाधारण असे महत्त्व असते. प्रादेशिक कादंबरी जिवंत व परिणामकारक होण्यासाठी तिच्यामध्ये स्थळ आणि काळ यातून जिवंत वातावरण निर्माण झाले पाहिजे हे जिवंत वातावरण कसे तयार होते हे सांगताना स.शि. भावे म्हणतात, "एक तर आनुवंशिक पिंडावर (heredty) सांस्कृतिक परंपरेचे संस्कार (socialization) होता होता तयार झालेला व्यक्तित्व कोश, दुसरे म्हणजे धर्म, जात, गाव, आर्थिक वर्ग, व्यवसाय इत्यादी सामाजिक संस्थांनी तयार झालेला व्यक्तिनिरपेक्ष असा सामाजिकतेचा कोश. सामाजिकतेचा कोश व्यापक, व्यक्तित्वाचा कोश हा आतला कोश या दोन कोशांचा संबंध, संवाद व संघर्ष या परस्पर विरोधी तत्वाच्या रूपात सतत चालू असतो. हे द्वंद्वात्मक सहजीवन-dialectical Coexistence म्हणजेच सामाजिक वस्तुस्थितीतून कलाकृतीत येणारे जिवंत वातावरण."[5] प्रादेशिक कादंबरीतील वातावरणाचा विचार करताना भावे यांनी सामाजिकतेला महत्त्व दिले आहे. कादंबरीतील सामाजिकता निसर्ग, समाज आणि व्यक्ती यांच्यामधील परस्पर देवाणघेवाणीतून साकार होते व कादंबरीतील पात्राद्वारे ती जिवंत बनते.

प्रादेशिक कादंबरीत निसर्ग वगळून व्यक्ती आणि समाज यांचे चित्रण केले तर ती सामाजिक कादंबरी ठरेल. ती प्रादेशिक कादंबरी ठरणार नाही. तसेच प्रादेशिक कादंबरीत केवळ निसर्ग वर्णन करून प्रादेशिकता निर्माण करता येणार नाही. तर त्या प्रदेशातील व्यक्तीच्या जगण्यावर इष्ट अनिष्ट परिणाम करणारी सामाजिक परिस्थिती त्या प्रदेशातील जीवनाच्या रेषा न रेषा चित्रित केल्या पाहिजेत. म्हणजेच प्रादेशिक कादंबरीत व्यक्ती, समाज आणि निसर्ग चित्रण आले पाहिजे.

४) बोलीभाषा आणि सामाजिकता:

प्रादेशिक साहित्यात सामाजिकता आणणारे एका आने येते ते अंग म्हणजे बोलीभाषा होय.

प्रादेशिक कादंबरीत त्या प्रदेशातील बोलीभाषेचा वापर केला जातो. प्रादेशिक बोलीभाषा ही तेथील लोकजीवनाचा एक भाग असते. त्या बोलीतून लोकमानस, लोकजीवन व्यक्त होते.

भाषा ही सामाजिक संस्था असल्याने समाजाचे अनेक गुणधर्म व वैशिष्टये तिच्यामध्ये असतात. विशिष्ट प्रदेशातील बोलीभाषेवर त्या प्रदेशातील समाजाचा प्रभाव पडलेला असतो. त्यामुळे प्रत्येक प्रदेशानुसार बोलीभाषेमध्ये फरक जाणवतो.

बोलीभाषेत आढळणारे शब्द, त्या शब्दाचे अर्थ, त्या शब्दाचे व्याकरणिक रूप, त्या बोलीची उच्चारपध्दती त्या बोलीला लागलेला तिथला सांस्कृतिक संदर्भ या सर्व गोष्टी सामाजिकतेतूनच आलेल्या असतात. प्रादेशिक साहित्यात बोलीला महत्व असते व ती बोली सामाजिकतेतूनच आपले रूप घेऊन येते.

बनगरवाडी, धग, पाचोळा, गोतावळा, इंधन यासारख्या प्रादेशिक कादंबरीत येणाऱ्या बोलीभाषेतील शब्द, वाक्प्रचार, म्हणी, वैशिष्टयपूर्ण प्रादेशिक शब्दावली विशिष्ट सामाजिक संकेतामधूनच निर्माण झालेले असतात. म्हणून प्रादेशिक साहित्याचा विचार सामाजिकतेच्या अंगाने केला पाहिजे.

प्रादेशिक साहित्य हे अस्सल प्रादेशिक साहित्य होण्यासाठी साहित्यामध्ये त्या प्रदेशातील लोकांची जीवनपध्दती, सामाजिक सांस्कृतिक परंपरा त्या पेदशातील निसर्ग त्या प्रदेशात बोलली जाणारी भाषा या सर्वांचे चित्रण झालेले असावे आणि हे सर्व प्रादेशिक साहित्यात आणण्यासाठी लेखकाला सामाजिकतेचा आधार घ्यावा लागतो.

प्रादेशिक साहित्य आणि सामाजिकता यांचा घनिष्ठ संबंध असून प्रादेशिक साहित्य जिवंत व परिणामकारक होण्यासाठी प्रादेशिक साहित्यात सामाजिकता आली पाहिजे.

ग्रामीण व प्रादेशिक साहित्याचा विचार केल्यानंतर आपणाला या दोन्हीमध्ये काही बाबतीत साम्य आढळते तर काही बाबतीत फरक आढळतो. या साम्यभेदाची चर्चा पुढे केली आहे.

<u>ग्रामीण आणि प्रादेशिक साहित्यातील साम्यभेद:</u>

ग्रामीण आणि प्रादेशिक साहित्यामध्ये काही फरक नसून एकच आहेत, असे अंबादास माडगूळकर व सूर्यकांत खांडेकर यांना वाटते. ते म्हणतात, "प्रादेशिकता म्हटली की ती ग्रामीण वाङ्मयाला अपरिहार्यपणे चकट येते. कारण प्रादेशिक म्हणून जी चित्रणे आजवर मराठीत आली आहेत ती सर्व ग्रामविषयक चित्रणे आहेत. म्हणूनच सर्व प्रादेशिक

वाङ्‌मयाला ग्रामीण वाङ्‌मय या सदराखाली घातले तरी त्यात फारशी चूक होणार नाही." [६] तर द.भि. कुलकर्णी यांना "प्रादेशिक कादंबरी हा ग्रामीण कादंबरीचाच अधिक वास्तवपूर्ण आविष्कार आहे." [७] असे वाटते. ग्रामीण आणि प्रादेशिक या दोन्ही संज्ञा अनागर जीवनावरील लिहिल्या गेलेल्या साहित्याला लावल्या जातात, म्हणून मधु कुलकर्णी यांना ग्रामीण आणि प्रादेशिक यामध्ये फारसा भेद वाटत नाही. त्यांच्या मते, "ग्रामीण आणि प्रादेशिक साहित्य यामध्ये काहींनी भेद मानलेला आढळतो. पण परिसर म्हणजे प्रदेश हे मान्य असल्यास ग्रामीण व प्रादेशिक या दोन्हीही संज्ञा तशा समानार्थीच आहेत. हे मान्य होण्यास हरकत नाही. किंचितसा फरक मानावयाचाच झाला तर प्रादेशिक ही संज्ञा ग्रामीण या संज्ञेपेक्षा जास्त व्यापक आहे असे फार तर म्हणता येईल." [८]

ग्रामीण आणि प्रादेशिक या दोन्ही साहित्यामध्ये ग्रामीण जीवनाचे चित्रण आलेले असते. दोन्ही ठिकाणी कृषिकेंद्रित समाजरचना असते. लोकांची विचार करण्याची पध्दत, लोकजीवन, लोकांच्या समस्या या बाबतीत दोन्हीमध्ये साम्य आढळते.

ग्रामीण आणि प्रादेशिक साहित्यामध्ये साम्य जरी असले तरी बारकाईने पाहिल्यास काही बाबतीत फरक जाणवतो.

ग्रामीण साहित्यातील घटना, जत्रा, कुस्त्या, खून, मारामाऱ्या या वरवरच्या व्यावहारिक जगाशीच संबंधित असतात. यातील आवाका नियती-पर्यंत जाऊन पोचत नाही. प्रादेशिक साहित्यात हे सर्वच असते. पण तेथे नियतीपुढे हतबल झालेल्या लोकांचे जीवन रेखाटलेले असते.

ग्रामीण आणि प्रादेशिक साहित्यातील फरक सांगताना म.सु. पाटील म्हणतात, "ज्याला आपण ग्रामीण म्हणतो ते जीवन प्रादेशिक इतके निसर्गनियत नसते. ग्रामीण जीवन हे ग्रामीण व्यवसाय आणि ग्राम-संस्था यांच्या चौकटीनी अधिक नियत असते... प्रादेशिक कादंबरीतील पात्रांच्या वृत्तिप्रवृत्तीवर प्रदेशाचे संस्कार जितके प्रबळ असतात तितके ग्रामीण कादंबरीतील पात्रावर नसतात." १

निसर्ग चित्रणाच्या बाबतीत ग्रामीण आणि प्रादेशिक साहित्यात फरक जाणवतो. ग्रामीण साहित्यात निसर्ग येतो. पण तो वरवरच्या पातळीवर येतो. बारीकसारीक तपशिलानी तो भरला जातोच असे नाही आणि कधी भरला तर तो केवळ तपशीलच राहतो. त्या प्रदेशातील जीवन घेऊन येत नाही. माणसाच्या जीवनाच्या दृष्टीने त्याचा परिणाम शून्यच ठरतो. परंतु प्रादेशिक साहित्यातील निसर्ग सर्वबारीकसारीक तपशिला-बरोबर येतो. तेथील माणसाचे जीवन घेऊन येतो. त्या प्रदेशातील माणूस आणि निसर्ग यांचा संबंध अतूट असतो. एकमेकाना वगळून [illegible] त्याचा विचार करता येत नाही.

आणखी एका बाबतीत प्रादेशिक आणि ग्रामीण साहित्यात आपणाला फरक जाणवतो. प्रादेशिक साहित्यातील पात्रांना त्या प्रदेशा-पासून अलग काढता येत नाहीत. त्या मातीतूनच ती वर आलेली असतात. व्यंकटेश माडगूळकर, श्री.ना. पेंडसे यांच्या कादंबऱ्यातील व्यक्ती त्या प्रदेशाची एकरूप झालेल्या असतात. त्यामुळे त्यांच्या कादंबऱ्यातील व्यक्ती इतर प्रदेशाची जुळवून घेत नाहीत. व्यंकटेश माडगूळकरांच्या "माणदेशी माणसं" या कथासंग्रहातील व्यक्तींना माणदेशामधून बाजूला काढता येत नाही. याउलट शंकर पाटलांच्या ग्रामीण कथांतून कोल्हापूर परिसरातील

आलेल्या व्यक्ती त्या प्रदेशातील न राहता त्या इतर कोणत्याही ग्रामीण प्रदेशात सापडतील अशा वाटतात.

ग्रामीण या संज्ञेपेक्षा प्रादेशिक ही संज्ञा अधिक व्यापक आहे. असे गं.ना. जोगळेकरांना वाटते. त्यांच्या मते "त्या त्या प्रदेशातील ग्रामीण जीवन आणि नागर जीवन यामध्येही एक विशेष प्रकारचे नाते असते. त्यामुळे कोकणातील ग्रामीण जीवन आणि विदर्भातील ग्रामीण जीवन यामध्ये जसे अंतर पडते तसे ते दोन्ही ठिकाणच्या नागर जीवनातही पडते. तेव्हा वस्तुत: प्रादेशिक वाङ्मय हे एक मोठे वर्तुळ आहे आणि त्या वर्तुळातील ग्रामीण साहित्य हे एक लहान वर्तुळ आहे. असे नामले पाहिजे." १०

सारांश -

आतापर्यंत आपण ग्रामीण व प्रादेशिक साहित्याचा सविस्तर विचार केला. ग्रामीण साहित्य हे अस्सल ग्रामीण साहित्य होण्यासाठी लेखकाजवळ ग्रामीण संवेदनशीलता असायला हवी. ग्रामीण साहित्यामध्ये येणारे ग्रामीण जीवन हे शहरी जीवनापेक्षा वेगळे आहे. आज ग्रामीण आणि प्रादेशिक साहित्य अशा वेगळ्या प्रकारच्या संज्ञा वापरल्या जातात. ग्रामीण आणि प्रादेशिक साहित्यात ग्रामीण जीवनाचेच चित्रण आलेले असले तरी प्रादेशिक साहित्यात विशिष्ट अशा प्रदेशाचे चित्रण केलेले असते. ग्रामीण आणि प्रादेशिक साहित्यात साम्य जरी आढळत असले तरी सूक्ष्मपणे पाहिल्यास काही बाबतीत फरक आढळतो.

.....

प्रकरण पहिले

संदर्भ ग्रंथ


१) अंबादास माडगूळकर, सूर्यकांत खांडेकर - ग्रामीण मराठी कथा, लेखन वाचन भांडार, पुणे, दुसरी आवृत्ती १९७९, प्रस्ता.,पृ. २.

२) पवार गो.मा. - "ग्रामीण संवेदनशीलता", सकाळ, रविवार पुरवणी, १ ऑगष्ट १९८१, पृ. १.

३) तत्रैव, - पृ. ३.

४) बोराडे रा.रं. - "प्रतिष्ठान", नोव्हेंबर, डिसेंबर, १९६४, पृ. ४५.

५) भावे स.शि. - "ग्रामीणता साहित्य आणि वास्तव" मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९८१, आनंद यादव, प्रस्ता, पृ. ३.

६) माडगूळकर, अंबादास, खांडेकर सूर्यकांत - ग्रामीण मराठी कथा, लेखन वाचन भांडार, पुणे, दुसरी आवृत्ती १९७९, प्रस्ता.पृ.४४-४५.

७) कुलकर्णी द.भि. - तिस-यांदा रणांगण, विजय, नागपूर १९७६ पृ. ९२.

८) कुलकर्णी मधु - "ग्रामीण साहित्य आणि साहित्यप्रकार" म.सा.प., ग्रामीण साहित्य विशेषांक, पुणे, जुलै-डिसेंबर, १९८०, पृ. ४५.

९) पाटील म.सु. - अक्षरवाटा, अनमोल, पुणे १९८२, पृ.६४.

१०) जोगळेकर ग.ना. - म.सा.प., ग्रामीण साहित्य विशेषांक, पुणे, जुलै-डिसेंबर, १९८०, पृ. ५५.

..........